Review of Research
International Online Multidisciplinary Journal
ISSN : 2249-894X Impact Factor 3.1402 (UIF) Volume -5 | Issue - 6 | March - 2016

# "कंपनी व ब्रिटिश सरकारकालीन खानदेशची रचना"



**पी.एस.सोनवणे.**
इतिहास विभाग , जिजामाता महाविद्यालय,नंदुरबार.

**प्रस्तावना :-**

१८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला आणि स्वराज्याचा एक गौरवशाली कालखंड संपला. व संपूर्ण महाराष्ट्रावर परकीयांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. शिवाजीराजांनी मोठ्या प्रयासाने निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य दुसऱ्या बाजीरावाच्या काळात लयास गेले. व मराठी समाज आणि संस्कृती परकीय वर्चस्वाखाली आली ही महाराष्ट्राच्या दृष्टीने दुर्दैवी घटना असली तरी कंपनी सरकारने महाराष्ट्रात पर्यायाने खानदेशात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक आणि शेती व्यवसाय क्षेत्रांत केलेली उल्लेखनीय कामगिरी पुरोगामी महाराष्ट्राच्या वाटचालीतील पहिले पाऊल होते.

**ईस्ट-इंडिया कंपनीकालीन खानदेश :-** १८१८ मध्ये तिसरे इंग्रज-मराठा युद्ध झाले व त्यात पेशव्यांचा पराभव होऊन इंग्रजांचा विजय झाला आणि त्यांनी महाराष्ट्रातील पेशव्यांचा प्रदेशाचे विभाजन करुन प्रत्येक विभागावर स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. एकूण ४ विभाग केले होते. १)खानदेश २)अहमदनगर ३)पुणे ४)धारवड हे असून या विभागांवर नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला पोलिटिकल एजंट म्हणून ओळखण्यात येत होते.[१] पेशवा दुसरा बाजीराव यांचा पाडाव झाल्यानंतर ब्रिटिशांनी पेशव्याचे राज्य आपल्या राज्यात विलीन करुन घेतले. १८१८ साली इंग्रजांनी

खानदेशावर कब्जा मिळविला आणि जॉन ब्रिग्ज यांची खानदेशचा कलेक्टर आणि पोलिटिकल एजंट म्हणून नेमणूक केली.[२] एलफिन्स्टनला पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या विश्वासातील माणसांची गरज होती. प्रशासकीय आणि लष्करी ही दोन्ही कामे यशस्वीपणे पार पाडू शकेल. व या प्रदेशाची माहिती असणारा अधिकारी वर्ग एलफिन्स्टनला हवा होता. त्याकरिता पुण्यासाठी लेफ्टनंट हेन्री रॉबर्टसन, खानदेशसाठी कॅप्टन जॉन ब्रिग्ज, अहमदनगरसाठी हेन्री पॉटींजर आणि नवनिर्मित सातारा राज्यासाठी पोलिटिकल एजंट म्हणून कॅप्टन ग्रँट यांची निवड एलफिन्स्टनने केली होती.[३] तसेच धारवाडसाठी विल्यम चॅपलिन यांची कलेक्टर म्हणून नियुक्ती केली होती. या अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकार क्षेत्रातील प्रदेशात विविध उपाययोजना केलेल्या आढळतात. त्यानुसार १८२४ मध्ये रॉबर्टसन यांनी खानदेशातील शिक्षणविषयक अहवाल सरकारला सादर केला होता. १८२७ मध्ये गिबर्न खानदेशचा कलेक्टर असताना त्यांनी सतीची चाल बंद व्हावी म्हणून प्रयत्न केले होते. तसेच १८३३ मध्ये ब्राईड खानदेशचा कलेक्टर असताना अमेरिका आणि इजिप्तमधून कापसाचे सुधारित बियाणे खानदेशात आणले होते. १८४० मध्ये आर. के. प्रिंगेल यांनी शिक्षण मंडळ मुंबई यांना त्यावेळच्या शाखांचा आणि विद्यार्थ्यांचा अहवाल कळविला होता. १८५२ मध्ये फैजपूर व सावदा येथील शेतकऱ्यांनी जमीन महसूल देण्यास नकार दिला असता तत्कालीन कलेक्टर मॅन्सफिल्ड यांनी एक जाहीरनामा काढून सावदा येथे बैठक घेऊन शासकीय आदेशाचे पालन करण्याचे आवाहन केले होते.[४] १८१८ पासून ते १८५७ पर्यंत विविध प्रशासकीय अधिकारी खानदेशात आले व त्यांनी तत्कालीन परिस्थितीनुसार खानदेशातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व इतर सुधारणांसाठी आणि खानदेशातील जनतेला आपल्या विषयी आस्था बाळगण्यासाठी विविध निर्णय घेतल्याचे दिसून येतात.

एखाद्या प्रदेशावर आपल्याला राज्य करावयाचे असेल तर त्या प्रदेशाची आपल्याला पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. तेथील लोकांचा इतिहास, चालीरीती या गोष्टी ज्ञात झाल्या तर त्या लोकांच्या भावना न दुखविता आपल्याला हवा तसा पाठिंबा मिळविता येतो आणि त्यांची सहानुभूती व विश्वास संपादन करता येतो. अशी ब्रिटिश अधिकाऱ्यांची धारणा असावी आणि त्यातूनच महाराष्ट्र, म्हैसूर, राजस्थान, मध्यप्रदेश वगैरे प्रांतांचे इतिहास एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधात तयार झाले असावे.[५] १८१८ मध्ये कॅप्टन जॉन ब्रिग्जची खानदेशचा पोलिटिकल एजंट म्हणून नियुक्ती झाली तेव्हा त्याला सर्वप्रथम सतावणारी समस्या भिल्लांची होती. शिंदे, होळकर, पेशवे यांच्यातील खानदेशातील सत्ता संघर्षाचा फायदा भिल्लांना मिळालेली एक मोठी संधी होती. खानदेशातील भिल्लांची बंडाळी, दंगेधोपे ही या प्रदेशातील नित्याची कटकट होऊन बसली होती. कॅप्टन जॉन ब्रिग्ज यांनी आपल्या पोलिटिकल एजंटच्या कारकीर्दीत खानदेशातील भिल्लांच्या समस्या सोडविण्याचा, त्यांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त करुन देण्याचा व त्यांना सामाजिक दर्जा मिळवून देण्याचा त्याने खूप प्रयत्न केला होता.[६] परंतु तत्कालीन राजकीय परिस्थिती आणि भौगोलिक स्थिती यामुळे या समाजाची प्रगती करण्यासाठी त्याला अजून काही कालावधीची आवश्यकता होती. खानदेश म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर भिल्ल 'जमात' आणि 'कापूस' या दोन गोष्टी येतात. विंध्य, सातपुडा, सह्याद्री या पर्वतांच्या आश्रयाने राहिलेली भारतातील ही सर्वात पुरातन आदिवासी जमात मानली जाते. खानदेशच्या इतिहासात कापूस उत्पादनास अनन्य साधारण स्थान आहे. मोगल बादशाह अकबर याच्या काळात धरणगाव हा परगणा कापड उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. १८१८ नंतर खानदेश ब्रिटिशांकडे आला तेव्हा पासून कापसाच्या उद्योग धंद्याकडे काही प्रमाणात लक्ष दिले जाऊ लागले. त्यानंतर खानदेशचा संबंध मुंबईशी आल्यामुळे आर्थिक विकासाच्या वाटा मोकळ्या झाल्या. १८२४ नंतर मुंबईच्या व्यापाऱ्यांनी वऱ्हाड आणि खानदेशातून कापूस खरेदी करण्यास सुरुवात केली. परंतु दळणवळणाच्या सुविधा नसल्यामुळे बैलगाड्यांद्वारे कापसाच्या गाठी मुंबईपर्यंत नेल्या जात होत्या. हे काम फार कष्टाचे व जिकरीचे होते.[७] १८६५ मध्ये सुमारे १४२ मैलांचा रेल्वेमार्ग खानदेशातून सुरु झाल्यामुळे कापसाला चांगलाच उठाव मिळाला. या आर्थिक उलाढालीचा स्वाभाविकपणे खानदेशाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक जीवनावरही परिणाम होऊ लागला होता. खानदेशात जिनिंग-प्रेसिंग हे जोडधंदे वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणावर सरकी उपलब्ध झाल्याने दुग्धोत्पादनात वाढ झाली होती. त्याकाळात खानदेशी लोणी प्रसिद्ध होती.[८] होळकरांचा पाडाव झाल्यावर खानेदश इंग्रजांच्या ताब्यात आला. कॅप्टन जॉन ब्रिग्ज याची पोलिटिकल एजंट या नात्याने खानदेशची सूत्रे त्याने आपल्या हाती घेतली आणि प्रशासनाच्या सोयीसाठी खानदेशचे १६ उप-विभागात विभाजन केले. १)अमळनेर २)भुसावळ ३)चाळीसगाव ४)चोपडा ५)धुळे ६)एरंडोल ७)जामनेर ८)नंदुरबार ९)नशिराबाद १०)पाचोरा ११)पिंपळनेर १२)सावदा १३)शहादा १४)शिरपूर १५)तळोदा १६)विरदेल इत्यादी. खानदेश आणि पुणे यांना जोडणाऱ्या राजमार्गावरील मध्यवर्ती ठिकाण म्हणून धुळे हे केंद्र निवडण्यात आले. म्हणूनच खानदेश जिल्ह्याचे कार्यालय धुळे येथे स्थापन करण्यात आले. त्या प्रमाणे कॅप्टन जॉन ब्रिग्जने ऑगस्ट १८१९ च्या पहिल्या आठवड्यापासून धुळे येथे खानदेशचे मुख्य कार्यालय सुरु केले होते.[९]

खानदेशात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाल्यावर शेती, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती इत्यादींसाठी कंपनी सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनी सरकारची सत्ता बरखास्त झाल्यानंतर १८५८ पासून ब्रिटिश पार्लेमेंटची सत्ता प्रस्थापित झाली होती.

**ब्रिटिशकालीन खानदेश :-** १८५७ च्या उठावामुळे कंपनी सरकाची सत्ता नष्ट झाली व भारतात ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता स्थापन झाली. एक खंडप्राय देश ब्रिटिशांची वसाहत बनली. बदललेल्या परिस्थितीनुसार हिंदुस्थानातील इंग्रज अधिकारी हा ब्रिटिश सरकारचा अधिकृत प्रतिनिधी बनला. त्याला 'गव्हर्नर जनरल ॲण्ड व्हाईसराय ऑफ इंडिया' असा हुद्दा देण्यात आला.[१०] कलकत्ता सरकारच्या अधिपत्याखाली कलकत्ता, मुंबई आणि मद्रास हे दोन इलाखे होते. मुंबई इलाख्याच्या कार्यक्षेत्रात सिंधचे उत्तरटोक ते कर्नाटकातील कारवारचे दक्षिणटोक आणि सिंधचे पश्चिम टोक ते खानदेश इतका विस्तृत प्रदेश मोडत होता. या प्रदेशाचा प्रमुख गव्हर्नरची नेमणूक पाच वर्षासाठी इंग्लंडमधून होत असे. त्याच्या मदतीला एक सल्लागार मंडळ असे. त्याच्या प्रशासनाला 'गव्हर्नर-इन कौन्सील' असे म्हणत असत. या नव्या व्यवस्थेप्रमाणे वॉरन हेस्टिंग्ज हा पहिला गव्हर्नर जनरल झाला. १८५७ नंतर सर्व परिस्थिती बदलली आणि हिंदुस्थानावर बिटिशांचा एकछत्री अंमल सुरु झाला.[११] मुंबई इलाख्यात ब्रिटिशांचे प्रशासन सुरु झाल्यावर इंग्रजांनी आपल्या राजवटीत या प्रांतात विविध भौतिक व सामाजिक सुधारणा केल्या. त्यात दळणवळणाच्या साधनांतील सुधारणा महत्त्वाच्या होत्या. विशेष म्हणजे मुंबई ते ठाणे हा पहिला रेल्वेमार्ग सुरु करण्यात आला. पुढे खानेदशातही रेल्वेमार्ग सुरु करण्यात आला. तसेच पोष्ट व तारायंत्राची सोय करण्यात आली. मुंबई प्रांताच्या अंतर्गत भागात संपर्क ठेवण्यासाठी छोटे मोठे रस्ते तयार करण्यात आले. त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने विविध फायदे झालेले दिसून येतात. या दळणवळणाचा व तारायंत्राचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी स्वातंत्र्य सैनिकांना एका भूप्रदेशातून दुसऱ्या भूप्रदेशात संपर्क साधता येणे शक्य झाले. व लोकांमध्ये स्वातंत्र्य चळवळी विषयी जागृती निर्माण झाली.[१२] सामाजिक बदल करण्यासाठी ब्रिटिशांनी काही सामाजिक सुधारणा केल्या होत्या. परंतु त्यासाठी त्यांना समाजाचा विरोध पत्करुन काही कायदे करणे भाग पडले. उदा. बालहत्या, नरबळी, सतीची चाल इत्यादी अनिष्ट सामाजिक प्रथांविषयी सुधारणा करणे महत्त्वाचे होते. कारण की या प्रथा धार्मिक भावनांशी निगडित होत्या. आणि भारतीय समाजाच्या धार्मिक भावना सांभाळून प्रसंगी विरोध पत्करुन कायदे पास करावे लागले.[१३] ''मला अशी भीती वाटते, की आपले भारतावरील साम्राज्य दीर्घकाळ टिकणारे नाही. हे विधान कोणत्याही पूर्वग्रहावर आधारित नसून ते तर्कशुद्ध आहे. ते कोणत्या मार्गाने लयाला जाईल हे सांगणे कठीण आहे. ही विभक्त होण्याची वेळ यावी आणि हे विभक्तीकरण लवकर होणे हे आपल्या हिताचे आहे. तसे झाले तर एका सुसंस्कृत देशापासून आपण दूर होत आहोत याचे आपल्याला समाधान लाभेल. अन्यथा एखाद्या असंस्कृत लोकांशी हिंसक मार्गाने आपले स्नेहसंबंध तुटतील आणि या देशात ज्या संस्था आपण रुजू केल्या आहेत त्या साऱ्या येथे स्थायिक झालेल्या आपल्या लोकांबरोबर आणि व्यापाराबरोबर नष्ट होतील''.[१४] १८५९-१८७९ या कालावधीत खानदेशातील जळगाव जिल्ह्यात दोन घटना घडल्या. त्या म्हणजे वरणगाव व एरंडोल मधील परगण्याचे अधिग्रहण (१८६१) तसेच खानदेशमध्ये असलेला मालेगाव व बागलाण जिल्ह्याचे नाशिक जिल्ह्यात हस्तांतरण. (१८६९) रेल्वे मार्गाचे आगमन झाले. व जळगाव शहराचा झपाट्याने विकास झाला. १८६४ मध्ये जळगाव तेथे नगरपालिकेची स्थापना झाली.[१५] १८२१ मध्ये एलफिन्स्टनने थॉमस मन्रोला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, ''नेटिवांवर राज्य करण्यासाठी चांगल्या नेटिवांचा सल्ला घेणं फार आवश्यक आहे. शिवाय त्यांच्या देशातल्या राज्यकारभारात त्यांना काही वाटा मिळेल असा मार्ग त्यांना दाखविणे आवश्यक आहे. कदाचित असे करण्याची जरुरी ५० वर्षेही पडणार नाही. पण कधी ना कधी लोकांच्या आचार-विचारात बदल होईल आणि त्यांना हलक्या दर्जाची कामे देऊन आपला कधी निभाव लागणार नाही. त्यांच्या हुशारीचं, महत्त्वाकांक्षेचं चीज होईल असा मार्ग त्यांना आपण खुला करुन दिला नाही तर त्यांचे हे दोन्ही गुण अनिष्ट मार्गांनी प्रगट होऊन आपलं राज्य उलथापालथं होईल''[१६] हिंदुस्थानसारख्या विशाल देशात विविध धर्म, भाषा, संस्कृती, भिन्न भिन्न परंपरा असलेल्या देशात नेटिव राज्यकर्त्याकडून सत्ता ताब्यात घेऊन नेटिवांना न दुखविता सुरळीतपणे प्रशासन चालविणे किती अवघड आहे, त्यासाठी ठायीठायी काळजी कशी घेतली पाहिजे, याचा एलफिन्स्टनला पुरेपूर अनुभव होता. म्हणूनच पाश्चिमात्य आणि पौर्वात्य अशा दोन्ही पद्धतीचा सुवर्णमध्य साधणं हे त्याचं धोरण होतं. म्हणूनच ब्रिटिशांनी १८५८ नंतर भारतीयांना इंडिया कौन्सिलमध्ये सामील करुन घेतलेले दिसून येते.

इंग्रजांनी मराठ्यांना आणि सर्व हिंदी लोकांना चांगले ओळखले होते. हिंदी राजे, संस्थानिक किंवा त्यांची विद्वान-अतिविद्वान, मुत्सद्दी हिंदुस्थानात राष्ट्रीयत्व निर्माण करु शकत नाहीत. कारण ते जगाच्या संस्कृतीत मागासलेले, अर्धरानटी, आपसात भांडणारे, शिस्तीचे व कवायतीचे महत्त्व न ओळखणारे, परकीय प्रभुत्वाची चीड न बाळगणारे, धर्मवेडात गुरफटलेले, आधुनिक राष्ट्र निर्मितीस पारखे, लोकसत्तेचे ज्ञान नसलेले आणि जगातील घडामोडीविषयी पूर्ण अज्ञानी असे आहेत. हे इंग्रजांनी ओळखलेले दिसून येते. त्यामुळे तेथील राजेरजवाड्यांना एका निशाणाखाली गोळा करुन, आपल्या साम्राज्याचा कोणी पाडाव करील, अशी भीती त्यावेळी ब्रिटिशांना मुळीच वाटत नव्हती. सर जॉन शोअर याने म्हटले आहे की, ''आपल्या गावा पलीकडे देशाचे प्रेम म्हणजे काय याचे ज्ञान हिंदी लोकांना नाही. एखाद्या अधिकाऱ्याविषयी किंवा स्वामीविषयी त्याला प्रेम किंवा निष्ठा वाटेल, पण एकंदर राज्यसंस्थेविषयी तो अगदी बेफिकीर असतो. जो पगार देईल त्याच्यासाठी तो लढेल आणि जर त्याला असे दिसून आले की, आपण ज्या सरकारची नोकरी करीत आहोत त्याचा पाडाव होत आहे तर तो त्या सरकारची नोकरी सोडून देईल आणि चांगल्या पगाराच्या किंवा लुटीच्या आशेने तो शत्रूपक्षाला जाऊन मिळेल''[१७]

एलफिन्स्टन व सर जॉन माल्कम या ब्रिटिश राज्यकर्त्यांना हे कळून चुकले होते की, 'येथील सामान्य जनता राष्ट्र निर्मितीच्या इ ाानापासून अलिप्त आहे. येथील राज्यकर्ते व संस्थानिक परकीयांविरुद्ध एकजुटीने लढून स्वातंत्र्य स्थापन करु शकतील असे एकमत त्यांच्यात नव्हते. विद्वानांना जगाचे, भौतिकशास्त्राचे आणि सामाजिक विद्याचे खूप अज्ञान आहे'**.** तेव्हा यांच्या पासून साम्राज्याला धोका नाही. अशी त्यांची पूर्ण खात्री होती.[१८] १८६९ पर्यंत नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, नांदगाव व बागलाण या तीन तालुक्यांचा समावेश खानदेशात होता. १८७९ मध्ये खानदेशचे प्रशासनाच्या सोयीसाठी अमळनेर, भुसावळ, चोपडा, जामनेर, एरंडोल, नशिराबाद, चाळीसगाव, सावदा, पाचोरा, धुळे, नंदुरबार, पिंपळनेर, शहादा, शिरपूर, तळोदा आणि विरदेल हे उपविभाग होते. त्याप्रमाणे भुसावळमध्ये-एदलाबाद, पाचोरामध्ये-भडगाव, अमळनेरात-पारोळा, सावद्यात-रावेर व यावल, पिंपळनेरमध्ये-निजामपूर या लहान विभागांचा समावेश होता. तसेच १९०६ मध्ये खानदेश जिल्ह्याचे पूर्व खानदेश आणि पश्चिम खानदेश असे विभाजन करण्यात येऊन जळगाव हे पूर्व खानदेशचे व धुळे हे पश्चिम खानदेशचे प्रशासनाचे मुख्यालयाचे केंद्र म्हणून स्थापन करण्यात आले होते.[१९]

## संदर्भ साधने


| | | |
|---|---|---|
| १. | पाटील एम.व्ही. | **''कंपनी सरकारकालीन खानदेश''**.शिवम प्रकाशन नंदुरबार, प्रथमावृत्ती २००७, पृ.क्र.३० |
| २. | कुलकर्णी अ.रा. | **''मध्ययुगीन महाराष्ट्र ''** पृ.क्र.२३९ |
| ३. | कुलकर्णी अ.रा. | **''कंपनी सरकार''** (ईस्ट इंडिया कंपनी) पृ.क्र. ७९ |
| ४. | पाटील एम.व्ही. | पूर्वोक्त पृ.क्र.३०-३१ |
| ५. | कुलकर्णी अ.रा. | **''जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहासकार व प्रशासक''**, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, जानेवारी १९७१ पृ.क्र.१२१. |
| ६. | कुलकर्णी अ.रा. | **''मध्ययुगीन महाराष्ट्र''** - पूर्वोक्त पृ.क्र.२५२-२५३ |
| ७. | कुलकर्णी अ.रा. | उपरोक्त पृ.क्र.२५२-२५४ |
| ८. | कुलकर्णी अ.रा. | उपरोक्त पृ.क्र.२५६ |
| ९. | जी. डी. जळगाव | मुंबई १९९४. पृ.क्रं. १९२ |
| १०. | कुलकर्णी अ.रा. | **''कंपनी सरकार''** (ईस्ट इंडिया कंपनी) पूर्वोक्त पृ.क्र. ९३ |
| ११. | कुलकर्णी अ.रा. | उपरोक्त पृ.क्र.९३ |
| १२. | आण्णासाहेब गरुड व प्राचार्य सावंत बी.व्ही. | **''महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास''**, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद १९९५, पृ.क्र.२५ |
| १३. | आण्णासाहेब गरुड व प्राचार्य सावंत बी.व्ही. | उपरोक्त पृ.क्र. २५ |
| १४. | कुलकर्णी अ.रा. | **''कंपनी सरकार''** (ईस्ट इंडिया कंपनी)पूर्वोक्त पृ.क्र.९२ |
| १५. | जी. डी. जळगाव | पूर्वोक्त पृ.क्र. ११४ |
| १६. | ओक प्रमोद | **''एलफिन्स्टन''**. राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, जानेवारी १९९९, पृ.क्र. १३६ |
| १७. | सहस्त्रबुद्धे पुरुषोत्तम | **''महाराष्ट्र संस्कृती''**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९४, पृ.क्र.६४५-६४६ |

| | | |
|---|---|---|
| | गणेश | |
| १८. | सहस्त्रबुद्धे पुरुषोत्तम गणेश | उपरोक्त पृ.क्र.६४६ |
| १९. | पाटील भी.ना. | **"खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ"** (१९००-१९५०). प्रकाशक भूषण बी. पाटील, पाचोरा प्रथमावृत्ती जून २००५. पृ.क्र.२ |